कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२५-२६/१७३९
दि.०२/०२/ २०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५६ वी मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने दि. ०९ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण २१ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी येथे रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. १३ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि. ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी **सप्तसुर सांस्कृतिक संगीत विद्यालय, नार्वे-डिचोली** या संस्थेच्या अतुल साळवी लिखित **"दानव"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. १० फेब्रुवारी रोजी प्रदीप दळवी यानी लिहिलेले **"मी नथूराम गोडसे बोलतोय"** हे नाटक **श्री सिध्देश्वर, हरमल-पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **सिध्दी क्रिडा आणि सांस्कृतिक संस्था, पोंबुर्फा -बार्देश** या संस्थेच्या वतीने श. ना. नवरे लिखित **"सूर राहू दे"** हे नाटक दि. ११ फेब्रुवारी रोजी होईल तर दि. १२ फेब्रुवारी रोजी वि. वा. शिरवाडकर यांनी लिहिलेले **"दुसरा पेशवा"** हे नाटक **रवळनाथ युनीटी स्पोर्टस् ॲण्ड कल्चरल कल्ब, तळर्ण-पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी विजय तेंडुलकर यांच्या लेखणीतून उतरलेले **"शांतता! कोर्ट चालु आहे"** या नाटकाचा प्रयोग **श्री पांडुरंग प्रासादिक नाटय मंडळ, विठ्ठलापूर-सांखळी**ही संस्था सादर करणार आहे.

**होमकुंड रंगभुमी, मडकई-फोंडा** ही संस्था बाळ कोल्हटकर यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **"सिमेवरुन परत जा"** हे नाटक दि. १६ फेब्रुवारी रोजी सादर करेल. **ओम कला सांस्कृतिक केंद्र, हळर्ण-पेडणे** ही संस्था नरेंद्र नाईक यांनी लिहिलेल्या **"अपराजित योध्दा"** हे नाटक दि. १७ फेब्रुवारी रोजी सादर करेल. दि. १८ फेब्रुवारी रोजी दिलीप परदेशी यानी लिहिलेले **"काळोख देत हुंकार"** हे नाटक **श्री शांतादुर्गा संगीत कला मंच, नानोडा-डिचोली** ही संस्था सादर करणार आहे. **श्री सांबसदाशिव कला व सांस्कृतिक मंडळ, शिवोली-बार्देश** या संस्थेच्या वतीने बाळ कोल्हटकर लिखित **"सिमेवरुन परत जा"** हे नाटक दि. २० फेब्रुवारी रोजी होईल तर दि. २३ फेब्रुवारी रोजी डॉ.तन्वी कामत बांबोळकर यांनी लिहिलेले व हर्षदा सुहास डोंगरे यांनी अनुवादित केलेले " **लॉगआऊट"** हे नाटक **गौरी तनय कला संघ, धोणशी, नागेशी-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे.

पु.शि.नार्वेकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"नवमीच्या मध्यरात्री"** हे नाटक दि. २४ फेब्रुवारी रोजी **शिवगणेश कला आणि सांस्कृतिक मंडळ, हळर्ण-पेडणे** ही संस्था सादर करेल.
गोविंद पुरुषोत्तम देशपांडे यांच्या लेखणीतून साकार झालेले **"चाणक्य विष्णुगुप्त"** हे नाटक दि. २५ फेब्रुवारी रोजी **श्री भुमिका नाटय मंडळ, पर्ये-मठ-सांखळी** ही संस्था सादर करेल तर दि.२६ फेब्रुवारी रोजी **श्री साई दिगंबर किडा आणि सांस्कृतिक मंडळ, आसगांव-बार्देश** या संस्थेच्या वतीने प्रसाद प्रेमानंद कळंगुटकर लिखित "**प्रिजनर्स ऑफ वॉर"** हे नाटक सादर करणार असून दि. २७ फेब्रुवारी रोजी भा. वि. वरेरकर यानी लिहिलेले "**करीन ती पुर्व"** हे नाटक **दुर्वांकुर कला केंद्र, हरमल-पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **ललितप्रभा नाटयमंडळ, वळवई-फोंडा** या संस्थेच्या वतीने रा. रा. शांताराम गोपाळ गुप्ते लिखित "**हिरा हरपला"** हे नाटक दि.०२ २०२६ मार्च रोजी होईल. जयंत पवार यांच्या लेखणीतून साकार झालेले **"अधांतर"** हे नाटक दि. ०५ मार्च रोजी **माऊली किएशन, इब्रामपूर-पेडणे** ही संस्था सादर करेल तर दि. ०६ मार्च रोजी दयाराम पाडलोस्कर यांनी लिहिलेल्या **"अपहृत"** या नाटकाचा प्रयोग **कलाकार कला मंच, मयडे-बार्देश** ही संस्था सादर करणार आहे. दि.९ मार्च रोजी अशोक पातोळे यांच्या लेखणीतून साकार झालेले "**हिच तर प्रेमाची गम्मत आहे"** हे नाटक **जुनस युनायटेड कल्चरल ॲण्ड स्पोर्टस् क्लब, मांद्रे-पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **नागेश कला मंच, नागेशी, बांदोडा-फोंडा** या संस्थेने गौतम अनंत गावडे यांनी लिहिलेल्या "**इन सर्च ऑफ"** या नाटकाचा प्रयोग दि.१० मार्च रोजी सादर होईल. **वेदांत एंटटेनमेंट, वाळपई-सत्तरी** या संस्थेने दशरथ मांद्रेंकर यांनी लिहिलेल्या **"महाबळी"** या नाटकाचा प्रयोग दि.१२ मार्च रोजी सादर होईल.दि.१३ मार्च रोजी स्पर्धेचा समारोप **ॐ कलासृष्टी, बांदोडा-फोंडा** या संस्थेच्या वतीने वसंत कानेटकर यांनी लिहिलेले "**रायगडाला जेव्हा जाग येते"** या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.१००/-च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी